# नियमित दिवाणी मुकदमा क्र.९८/२०१५ मधील नि.५ खालील आदेश
## (जगन्नाथ तुकाराम माने वगैरे ६ *विरुध्द* रामचंद्र तुकाराम माने वगैरे २)

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम ३ प्रमाणे प्रतिवादी क्र.२ विरुध्द तुर्तातुर्त मनाई मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

वादींचे थोडक्यात कथन असे की,

(२) जिल्हा सांगली, तालुका व पोट तुकडी तासगांव पैकी मौजे सावर्डे येथील शेतजमीन गट क्र.८९३ क्षेत्र ०.७२ आर, पोट खराब ०३ आर हा संपूर्ण गट नंबर दावा मिळकत आहे. सदर मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ यांची एकत्र हिंदू कुटुंबाची मिळकत असून वादी व प्रतिवादी यांची त्यामध्ये सामाईक वहिवाट होती व आहे. वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार तुकाराम सखाराम माने हे ७५ वर्षांपूर्वी मयत झाले असून त्यांचे पश्चात वादी व प्रतिवादी दावा मिळकतीत सामाईक वहिवाट करीत आहेत. प्रतिवादी क्र.१ हा वादी क्र.१ चा भाऊ असून वादी क्र.२,३,५,६ यांचे चुलते आहेत. वादी क्र.४ हया वादी क्र.२,३,५,६ यांच्या आई असून मयत मारुतीच्या पत्नी आहेत. दावा मिळकतीचे यापूर्वी कधीही सरसनिरस मानाने वाटप झालेले नसताना प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीतील ५ आणे ४ पै चा हिस्सा चतुःसिमापूर्वक प्रतिवादी क्र.२ यास दि.१३.५.२०१५ रोजी र.रु.२१००००/– इतक्या रकमेस खरेदी दिलेला आहे. सदर बेकायदेशीर खरेदी दस्ताचे आधारे प्रतिवादी क्र.२ दावा मिळकतीत विशिष्ट बाजूचा कब्जा घेणेचा प्रयत्न करीत आहे. प्रतिवादी क्र.२ हा अनोळखी खरेदीदार असून दावा मिळकतीचे वाटप झालेले नसताना त्याने एका विशिष्ट बाजूचा कब्जा घेवू नये याकरिता वादीने निरंतर मनाई मागितलेली आहे.

(३) दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलार्जित, सामाईक मालकी हक्काची मिळकत असल्याने वादीस ती खरेदी घेणेचा अग्रहक्क आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वाद मिळकतीतील हिस्सा प्रतिवादीने वादीस विकणेबाबत एकमत झाले होते. परंतु, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ यास त्याचा हिस्सा खरेदी दिला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांचेमधील खरेदीचा व्यवहार मुंबई तुकडे बंदी तुकडे जोड कायद्याच्या विरुध्द आहे. याबाबतही वादीने मूळ दाव्यात दाद मागितली आहे. तथापि प्रतिवादी क्र.२

दि.१३.५.२०१५ चे खरेदीपत्राचे आधारे दावा मिळकतीतील विशिष्ट बाजूकडील भागाचा कब्जा घेणेचा प्रयत्न करीत असून वादी व प्रतिवादी यांच्या सामाईक वहिवाटीस त्यामुळे अडथळा येत आहे. त्यामुळे, वादीने प्रतिवादी क्र.२ व त्याचे तर्फे इसमांनी दावा मिळकतीतील वादींचे वहिवाटीस बाधा येईल असे कृत्य करु नये व जबरदस्तीने कब्जा घेवू नये अशी तुर्तातुर्त ताकीद मागितली आहे.

(४) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.२६ कडे मूळ दाव्यास कैफियत व नि.५ चे अर्जास म्हणणे दाखल करुन वादींचा दावा व मनाई अर्ज नाकारलेला आहे. प्रतिवादींचे कथनाप्रमाणे, वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार हे ६५ वर्षांपूर्वी मयत झाले असून त्यांचे मृत्यूनंतर प्रतिवादी क्र.१ व वादी क्र.२,३,५,६ यांचे पूर्वहक्कदार मयत मारुती माने यांचेदरम्यान गावातील पंच लोकांचेसमोर दावा मिळकती व अन्य मिळकतींचे वाटप झाले आहे व त्याप्रमाणे त्यांच्या स्वतंत्र वहिवाटी चालू होत्या व आहेत. या वाटपाप्रमाणे वादी व वादी क्र.२ ते ६ यांनी आपले मालकीचा हिस्सा वित्तीय संस्थांकडे तारण देवून कर्जे घेवून आपापले हिस्से विकसित केले आहेत. प्रतिवादी क्र.१ हा ७३ वर्षांचा वयोवृध्द इसम असून त्याला पत्नी येसाबाई व मुलगी राजक्का असे वारस आहेत. त्यास मुलगा नाही. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२ हा प्रतिवादी क्र.१ च्या हिश्श्यात मेहनत, मशागत करुन शेती उपयोगी कामे करतो व प्रतिवादी क्र.१ व त्यांची पत्नी यांची काळजी घेतो. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व त्याची पत्नी व मुलगी यांनी दावा मिळकतीतील त्यांचा हिस्सा दि.१३.५.२०१५ चे नोंद खरेदीपत्राने प्रतिवादी क्र.२ याचे प्रत्यक्ष कब्जात दिला आहे. सदर खरेदीपत्राचे पूर्वीपासून प्रतिवादी क्र.२ दावा मिळकतीचे कब्जेवहिवाटीत आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांचे खरेदी व्यवहारास तुकडे बंदी तुकडे जोड कायद्याची बाधा येत नाही. प्रतिवादी क्र.२ याची गट क्र.१११५ ही शेतजमीन दावा मिळकतीचे जोडकाकरीस लागून आहे. प्रतिवादी क्र.२ व त्याची पत्नी हे वयोवृध्द असून त्यांच्या मुलीचे लग्न झाले आहे व ती सासरी नांदत आहे. प्रतिवादी क्र.२ हा मुलाप्रमाणे त्यांची देखभाल करतो. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ यास दावा मिळकतीचा खरेदीपत्राने कब्जे वहिवाट दिली आहे.

(५) वादी क्र.२ ते ६ चे पूर्वहक्कदार मयत मारुती तुकाराम माने याचे मृत्यूनंतर सदर वादी दावा मिळकतीत पूर्वी झालेल्या वाटपाप्रमाणे स्वतंत्रपणे मालकी वहिवाट करीत

होते व आहेत. वादींनी दि.२२.१.२००२ रोजी वाद मिळकतीतील वाटपाने आलेला त्यांचा हिस्सा सावर्डे विकास सोसायटीकडे तारण देवून कर्ज घेतले आहे. त्याप्रमाणे फेरफार क्र.६७८८ चा फेरफार होवून त्याची दावा मिळकतीच्या अभिलेखासदरी नोंद झाली आहे. वादी व वादी क्र.२ ते ६ चे पूर्वहक्कदार मारुती व प्रतिवादी क्र.१ यांचेत पूर्वीच वाटप झालेने त्यांचे एकत्र कुटुंब विभक्त झाले असल्याने वादीचा अग्रहक्काचा दावा चालत नाही. वादीच्या दाव्यास इस्टोपल आणि ॲक्वझन्स या तत्वाची बाधा येते. या सर्वांचा विचार करता वादींचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

(६) दोन्ही पक्षकारांच्या सन्माननीय विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पाहिला. प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकरिता खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचाराधीन निर्माण झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेतः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींनी सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | होकारार्थी |
| २ | वादींनी अनुकूलतेचा कल त्यांच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| ३ | वादींनी तुर्तातुर्त मनाई नाकारल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| ४ | काय आदेश ? | वादींचा नि.५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो |

(७) वादींनी आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ नि.३ कडे कागदपत्रे दाखल केली आहेत. प्रतिवादींनी नि.३२ व नि.३४ कडे कागदपत्रे दाखल केली आहेत. वादी यांनी त्यांचा अर्ज व दाखल केलेल्या कागदपत्रांस अनुसरुन व प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे व दाखल केलेल्या कागदपत्रांस अनुसरुन युक्तिवाद केला.

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ ते ४ करिताः-

(८) वादींनी मूळ दावा वाटपाकरिता व अग्रहक्काने गट क्र.८९३ पैकी प्रतिवादी

क्र.१ चा हिस्सा खरेदी करुन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादींचे कथनाप्रमाणे वादी क्र.१, वादी क्र.२ ते ६ यांचे पूर्वहक्कदार मारुती व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान अद्याप सरसनिरसमानाने वाटप झालेले नाही. सर्वांची दावा मिळकतीत सामाईक वहिवाट आहे. असे सरसनिरस मानाने वाटप झालेखेरीज प्रतिवादीस त्याचा हिस्सा त्रयस्थ इसमास विकता येणार नाही. याउलट, प्रतिवादीचे कथनाप्रमाणे वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.१ चे वडील तुकाराम माने यांचे मृत्यूपश्चात ५० वर्षापुर्वी पंचांसमक्ष वाटप झाले आहे. त्याप्रमाणे तिन्ही भावांच्या स्वतंत्र मालकी कब्जेवहिवाटी होत्या व आहेत. त्याप्रमाणे, त्यांनी त्यांचे हिस्से तारण ठेवून कर्जे घेतली आहेत. तथापि, सरसनिरस मानाने वाटप झालेबाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा प्रतिवादींनी याकामी दाखल केलेला नाही. केवळ वादी व प्रतिवादींनी त्यांचे सामाईक क्षेत्रावर कर्जे घेतली यावरुन त्यांचेत सरसनिरस मानाने वाटप झाले आहे असे अनुमान काढता येणार नाही. प्रतिवादीने वादी व त्याचेमध्ये त्याचे कथनाप्रमाणे वाटप झाले व त्याप्रमाणे त्यांचे स्वतंत्र हिस्सेमध्ये मालकी व कब्जेवहिवाट होती व आहे हे ठोस व भक्कम पुराव्याने शाबित करणे आवश्यक आहे. सबब, दावा मिळकतीचे वादी, वादी क्र.२ ते ६ यांचे पूर्वहक्कदार व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान वाटप झाले आहे किंवा नाही याबाबत दाव्याचे चौकशीवेळी सखोल पुरावा पाहणे आवश्यक आहे.

(९) प्रस्तुत अर्जात वादीने प्रतिवादी क्र.२ विरुध्द त्याने दावा मिळकतीतील गट क्र.८९३ सामाईक हिस्सेत खरेदीपत्राच्याआधारे कब्जा घेवू नये अशी मागणी केली आहे. याठिकाणी विशेषतः नमूद करावयाची बाब म्हणजे, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी खरेदीपत्र झालेचे मान्य केले आहे. या खरेदीपत्राआधारे गट क्र.८९३ मधील प्रतिवादी क्र.१ चे ५ आणे ४ पै क्षेत्र प्रतिवादी क्र.२ कब्जेवहिवाटीत असलेचे प्रतिवादी कथन करत आहे. याकामी वादीने नि.७ कडे दि.३०.५.२०१५ चा दावा मिळकत गट क्र.८९३ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता, वादी क्र.१ , वादी क्र.२ ते ६ व प्रतिवादी क्र.१ हे प्रत्येकी ५ आणे ४ पै क्षेत्र दावा मिळकतीत सामाईकात वहिवाटीत असलेची नोंद आहे. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये दावा मिळकत गट क्र.८९३ ही सरसनिरस मानाने वाटप झालेबाबत स्वतंत्र क्षेत्राचे चतुःसिमापूर्वक वर्णन नमूद नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.३५/३ कडे दि.२६.९.२०१७ रोजीचा गट क्र.८९३ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यामध्ये, प्रतिवादी क्र.१ चे नावास कंस

होवून प्रतिवादी क्र.२ चे नांवाची नोंद झालेली आहे. नि.३/७ कडील दि.१३.५.२०१५ चे खरेदीपत्राचे अवलोकन केले असता त्यास वादींची संमती प्रतिवादीने घेतलेली नाही, ५ आणे ४ पै क्षेत्र चतुःसिमापूर्वक विक्री केले आहे. महत्वाचे म्हणजे, या चतुःसिमांमध्ये प्रतिवादी क्र.२ ची मिळकत दावामिळकतीचे चतुसीमेत असलेचे वर्णन नाही. यावरुन, प्रतिवादी क्र.१ व २ हे लगत धारक नाहीत हे स्पष्ट होते. या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे दरम्यान सरसनिरस मानाने वाटप झालेले नसताना प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ यास दावा मिळकतीमधील सामाईक हिस्सा विकल्याचे व त्यामध्ये प्रतिवादी क्र.२ हा अनोळखी खरेदीदार असून तो कब्जा घेण्याचा प्रयत्न करत असलेचे स्पष्ट दिसून येते.

(१०) वादींतर्फे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, हिंदु कायद्यातील प्रचलित तत्वानुसार अनोळखी खरेदीदाराने अविभाजित हिस्सा खरेदी केल्यास वाटपाकरिता दावा करुन खरेदी क्षेत्राचा ताबा मागितलेखेरीज खरेदी क्षेत्रात त्याला कब्जेवहिवाट करता येणार नाही. असा दावा प्रतिवादी क्र.२ ने केलेला नाही. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वाटप झालेले नाही. वादी हे प्रतिवादी क्र.१ चा हिस्सा अग्रहक्काने खरेदी घेणेस तयार होते व आहेत. असे असतानाही प्रतिवादी क्र.१ ने त्याचा हिस्सा प्रतिवादी क्र.२ यास खरेदी दिलेला आहे. प्रतिवादी क्र.२ ने तसे क्षेत्र खरेदी घेतले असले तरी वाटप न झाल्याने प्रतिवादी क्र.२ ला वाटपाशिवाय विशिष्ट क्षेत्रात व चतुःसिमेतील जागेत कब्जा सांगता येणार नाही व वादीचे दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करता येणार नाही.

(११) याउलट, प्रतिवादींतर्फे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, ५०-६० वर्षांपूर्वी झाले वाटप व स्वतंत्र कब्जेवहिवाटीप्रमाणे प्रतिवादी क्र.१ दावा मिळकतीतील ५ आणे ४ पै मध्ये मालकी हक्काने कब्जेवहिवाटीस होता. प्रतिवादी क्र.१ यास मुलगा नसल्याने प्रतिवादी क्र.२, त्याची मुलाप्रमाणे देखभाल करतो व प्रतिवादी क्र.१ ची शेतीही करतो. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२ यांचा खरेदीपत्रापूर्वीपासून दावा मिळकतीत प्रतिवादी क्र.१ चे हिस्सेत कब्जा आहे. याची माहिती वादींना आहे. हिंदु कायदयातील तरतुदीप्रमाणे, तोच कब्जा खरेदीपत्राने कायम झाल्याने वादींना कोणताही हरकत, अडथळा होत नाही.

(१२) दोन्ही पक्षांचा युक्तिवाद पाहता, प्रतिवादी क्र.१ ने तो तोंडी वाटपाप्रमाणे दावा मिळकतीतील विशिष्ट ५ आणे ४ पै मधील स्वतंत्र कब्जेवहिवाटीत होता हे दर्शविणारा सकृतदर्शनी पुरावा आणलेला नाही. दाव्यासोबत दाखल केलेल्या ७/१२ उता-यामध्ये रामचंद्र (प्रतिवादी क्र.१), वादी क्र.१ (जगन्नाथ), वादी क्र.२ ते ६ चे पूर्वहक्कदार (मारुती) हे सामाईक कब्जेवहिवाटीत असल्याचे नमूद आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांची सरनाम्यामध्ये व.व.७३ आणि व.व.६५ असे नमूद असल्याने त्यांची वये पाहता, प्रतिवादी क्र.२ हा मुलाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ व त्याच्या पत्नीची देखभाल करत असल्याचे प्रतिवादीचे कथनात तथ्य दिसून येत नाही. तसेच, प्रतिवादी यांनी खरेदीपत्रापूर्वीपासून अनेक वर्षे दावा मिळकतीतील ५ आणे ४ पै चे खरेदीपत्रात चतुःसिमांसहित वर्णन केलेले क्षेत्र प्रतिवादी क्र.२ याचे कब्जेवहिवाटीत असलेचे दर्शविणारा कोणताही स्वतंत्र पुरावा प्रतिवादी यांनी दाखल केलेला नाही. त्यामुळे, प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी दावा मिळकत खरेदीपत्रापूर्वीपासून प्रतिवादी क्र.२ याचे कब्जेवहिवाटीत असल्याने प्रतिवादी क्र.२ चे वहिवाटीस मनाई मागता येणार नाही या युक्तिवादात तथ्य दिसून येत नाही. प्रतिवादी क्र.२ चा दावा मिळकतीत खरेदीपत्रापूर्वीपासून मालकी हक्काने कब्जेवहिवाट अगर कब्जावहिवाट आहे हे ठरविणेकरिता विस्तृत पुराव्याची आवश्यकता आहे. विशेष म्हणजे, नि.३४/३ कडील दावामिळकतीचा ७/१२ उतारा पाहता, प्रतिवादीने दावा दाखल झाल्यानंतर त्याचे नावाची नोंद करुन घेतल्याचे व यावरुन तो वादींचे दावामिळकतीतील सामाईक मालकी व कब्जेवहिवाटीस हरकत,अडथळा करत असल्याचे दिसून येत आहे. सबब, या सर्व कागदपत्राचे व परिस्थितीचे अवलोकन केले असता वादीने खरेदीपत्रानंतर एक महिन्यातच वाटपाचा, अग्रहक्काचा व मनाईचा दावा व प्रस्तुतचा मनाई अर्ज दाखल केल्याचेही स्पष्ट होत आहे.

(१३) प्रतिवादींनी दावा मिळकतीचे सरसनिरसमानाने वाटप झालेबाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा दिलेला नाही. त्यामुळे, सद्यस्थितीत दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे सामाईक कब्जेवहिवाटीत असलेचे स्पष्ट होते. तसेच, प्रतिवादी क्र.२ हा वादीचे सामाईक कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करत असलेचेही स्पष्ट होते. प्रतिवादी क्र.२ असे सामाईक क्षेत्रातील प्रतिवादी क्र.१ चा अविभाजीत हिस्सा स्वतंत्र वाटपाचा दावा करुन मागितलेखेरीज वादीसोबत दावा मिळकत खरेदी घेतली असली तरीही तो मिळकतीचे

कब्जेवहिवाटीत येवू शकणार नाही. याकरिता, वादींनी *रामदास विरुध्द सिताबाई व इतर, २००९ ऑल एमआर १३६८* या निवाड्यावर भिस्त ठेवली आहे. या निवाडयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असा निर्वाळा दिला आहे की, एकत्र कुटुंबातील अविभाजीत हिस्सा सहहिस्सेदारास विकता येईल. परंतु सरसनिरस मानाने वाटप झालेखेरीज खरेदीदारास खरेदी क्षेत्राचा कब्जा घेता येणार नाही. तसेच अविभाजीत हिस्सा खरेदी करताना अन्य सहहिस्सेदारांची परवानगी घेतली नसल्यास अगर खरेदी व्यवहाराची माहिती अन्य सहहिस्सेदारांना न देता, त्यांची संमती न घेता अविभाजीत हिस्सा खरेदी घेतल्यास अशा स्थितीत खरेदीचा व्यवहार निःपक्षपातीपणे व न्यायाने (equity) झाला असे म्हणता येणार नाही व अशा खरेदी व्यवहाराआधारे खरेदीदारास इतर सहहिस्सेदारांबरोबर सामाईक कब्जेवहिवाट सांगता येणार नाही.

(१४) प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.१ ने सर्व दावा मिळकत विकलेली नाही. परंतु, दावा मिळकतीतील अविभाजीत हिस्सा वादींचे संमतीशिवाय प्रतिवादी क्र.२ यास विकलेला आहे. अशा परिस्थितीत, वादी व प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीचे सामाईक मालकी कब्जेवहिवाटीत असताना प्रतिवादी क्र.१ यास अविभाजीत सामाईक हिस्सा विकता येत असला तरीही त्या क्षेत्राचा कब्जा योग्य त्या कायदेशीर कारवाईखेरीज व सरसनिरसमानाने वाटप झालेखेरीज घेता येणार नाही. वादींतर्फे वरील संदर्भीय दिलेला *रामदास विरुध्द सिताबाई* या प्रकरणातील व प्रस्तुत प्रकरणातील तथ्यांचे (facts) अवलोकन केले असता, हा निर्वाळा या प्रकरणास लागू होत असल्याचे स्पष्ट होते.

(१५) प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, मा. मद्रास उच्च न्यायालयाच्या निणर्याप्रमाणे अनोळखी खरेदीदार पुर्वीपासूनच दावा मिळकतीचे कब्जेवहिवाटीत असेल तरीही वाटपापुर्वी खरेदी क्षेत्राचा सामाईक कब्जा अन्य सहहिस्सेदारांसह उपभोगू शकत नाही, परंतु मा. मुंबई उच्च न्यायालयाचे निर्णयांप्रमाणे न्यायालय त्यांचे स्वेच्छाधिकार वापरुन वाटपापूर्वीही खरेदीदारास तो tenant-in-common असल्याने सामाईक कब्जा उपभोगणेचा आदेश करु शकते. तथापी वर संदर्भ दिलेला *रामदास विरुध्द सिताबाई* हा निवाडा सन २००९ मधील असून मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर बेंच यांनी दिलेला निवाडा मा. सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेला आहे

व या न्यायनिवाड्यानुसार वादींची संमती न घेता प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीत त्याचा अविभाजीत हिस्सा विशिष्ट चतुःसिमांसहित विकला असला तरीही सरसनिरस मानाने वाटप झालेखेरीज त्याचा हिस्सा प्रतिवादी क्र.२ यास देता येणार नाही, असे न्यायतत्व (equity) निर्माण होणार नाही. सबब, या सर्वाचा विचार करता प्रतिवादी क्र.२ वादींचे दावा मिळकतीतील सामाईक मालकी कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु शकत नाही हे सकृतदर्शनी शाबित होते. वरील सर्व विवेचन व कायद्याची स्थिती पाहता, वादींचा मनाई अर्ज नामंजूर झाल्यास त्यांचे कायदेशीर हक्कांचे नुकसान होणार असलेचे व वाटपाखेरीज विशिष्ट क्षेत्राचा कब्जा प्रतिवादीकडे गेल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार असलेचे व न्यायाचे अनुकूलतेचे तत्व त्यांचे बाजूने असलेचे वादींनी सकृतदर्शनी सिध्द केले आहे. सबब, या सर्वांचा विचार करता, मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे. या निष्कर्षास अनुसरुन मुद्दा क्र.४ चे निष्कर्षाकरिता मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः–

## आदेश

(१) वादींचा नि.५ कडील प्रतिवादी क्र.२ विरुध्दचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

(२) प्रतिवादी क्र.२ अगर त्यांचेतर्फे इसमांनी वादींचे दावा मिळकतीतील वहिवाटीस बाधा येईल अशी कृत्ये करु नयेत, जबरदस्तीने कब्जा घेवू नये अशी दाव्याचे अंतिम निकालापर्यंत तुर्तातुर्त ताकीद देणेत येते.

(३) या अर्जाचा खर्च मूळ दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.
(आदेश खुल्या न्यायालयात सही करुन घोषित केला)

Sd/–

तासगांव (श्रीमती एस.एस. मांजरेकर)
दि.१३.१०.२०१७ सह–दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
तासगांव